महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/१८५७ दिनांक 12 OCT 2020

महत्वाचे/तात्काळ

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका/पदवी/पद्व्युत्तर पदवी संस्था
औरंगाबाद विभाग.

विषयः- **शासकीय व शासन अनुदानीत संस्थांनी खुला,ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०१० ते २०२० मध्ये घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती देणेबाबत.**

संदर्भः- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं.२अ/एडीएम/२०२०/२६१, दिनांक २८.०९.२०२०

२. श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष,सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दि.०१.१०.२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष,सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी खुला,ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०१० ते २०२० या वर्षात घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती मागितली आहे. या संदर्भात आपणास कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेने खुला,ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०१० ते २०२० मध्ये घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती या कार्यालयास DV-TTNatraj या Font मध्ये तयार करुन Soft Copy सह ई-मेलव्दारे या कार्यालयास सादर करावी. माहिती कालमर्यादेत संबंधीतांना पाठविणे आवश्यक असल्यामुळे सदरील कार्यवाही प्रथम प्राध्यान्याने करण्यांत यावी.

सोबत : उपरोक्त प्रमाणे

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : ०१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
०२. श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष,सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांना ई-मेल amarekad@gmail.com व्दारे माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/ २६१ दिनांक : 28 SEP 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- शासकीय व शासन अनुदानीत संस्थांनी खुला, ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०१० ते २०२० मध्ये घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती देणेबाबत....

संदर्भ : श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष, सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य, यांचे दिनांक १८.९.२०२० रोजीचे पत्र

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष, सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी खुला, ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून २०१० ते २०२० या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती संदर्भाधीन पत्रान्वये मागितली आहे. (पत्राची प्रत सोबत जोडली आहे)

त्यानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शासकीय व शासन अनुदानीत संस्थांनी खुला, ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०१० ते २०२० मध्ये घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती श्री अमर एकाड यांना त्यांच्या amarekad@gmail.com या ई मेल पत्त्यावर सात दिवसांत देण्यात यावी व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\2020-21\General Correspondence\Mr.Jalindar Ekad information letter to RO.docx

सुराज्य निर्माण सेना प्रणित,
# सुराज्य विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य
## अमर जालिंदर एकाड
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
नोंदणीकृत नंबर महाराष्ट्र १०८०/२०१७-२०१८ महाराष्ट्र २३१/२०१८ पुणे
amarekad@gmail.com 9137992799



दिनाक-१८-०९-२०२०

प्रति,
डॉ. अभय वाघ
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई

विषय - महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यास चालविणाऱ्या संस्थानी खुला इबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात (२०१० ते २०२०) घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काच्या माहितीची साक्षांकित प्रत सात दिवसात amarekad@gmail.com व मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या ईमेलवर मेल करण्याबाबत

~~महोदय~~ संदर्भ - १] शिक्षण संचालक शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्र. उशिसं / शिष्य २०२०-२१/५२२५ दिनांक १८ ऑगस्ट २०२०

२] उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक २६ ऑक्टोबर २००९, ६ नोव्हेंबर २०१०, ८ नोव्हेंबर २०११, ११ ऑक्टोबर २०१२, ७ नोव्हेंबर २०१२, ३ मार्च २०१४, १३ ऑक्टोबर २०१६, ७ ऑक्टोबर २०१७ व ६ सप्टेंबर २०१८

३] सामाजिक न्याय विभागाचे शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००३, ५ जानेवारी २००५, २७ जून २००५ व १५ जानेवारी २०२०

महोदय

संदर्भ क्र. १ नुसार शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाचे कुलसचिव व सहसंचालक उच्च शिक्षण यांना शैक्षणिक वर्ष (२०१० ते २०२०) विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती सादर करण्याचे आदेश दिले होते. त्याचप्रकारे आपणही महाराष्ट्रातील सर्व व्यावसिक अभ्यास चालविणाऱ्या संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांना २०१० ते २०२० पर्यंत विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काची माहिती सादर करण्याचे आदेश द्यावेत.

महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या खुला इबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळते. या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे कॉलेजांना सरकारकडून मिळतात. मात्र अनेक व्यावसायिक संस्था विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारत आहे. तसेच अनेक व्यावसायिक संस्थानी शुल्क नियामक प्राधिकरणाकडून शैक्षणिक शुल्क व विकास शुल्क मंजूर न केल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहिले आहेत.

अशा संस्थेवर कडक कार्यवाही करावी अनेक संस्थानी AISHE पोर्टलवर माहिती न भरल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहिले आहेत. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून सदर संस्थेची मान्यता रद्द करावी.

अनेक संस्थेच्या लॉगिनमध्ये (Clerk / Principal login) प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित आहेत. याची गंभीर नोंद घेऊन सदर संस्थेवर कार्यवाही करावी.

वरील सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यास चालविणाऱ्या संस्थानी खुला ईबीसी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात (2010 ते 2020) घेण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या शुल्काच्या माहितीची साक्षांकित प्रत सात दिवसांत amarekad@gmail.com व मा. संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या ईमेलवर मेल करावी. तसेच महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक अभ्यास चालविणाऱ्या संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांचे भ्रमणध्वनी व ईमेल तात्काळ amarekad@gmail.com या माझ्या ईमेलवर पाठवावी ही आपणास नम्र विनंती.

आपला विश्वासू

Amar

(अमर जालिंदर एकाड)